## व्यवसाय / धंधा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com





**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २६३ वा | शनिवार, दि. ३१ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# 'ढेकळांचे पंचनामे करायचे का ? कृषीमंत्री कोकाटे पुन्हा बरळले

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे त्यांच्या विधानावरून कायमच चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वी माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून एक विधान केलं होतं. त्यामुळे त्यांच्यावर राज्यभरातून टीका झाली होती. त्यानंतर त्यांनी माफी देखील मागितली होती. त्यानंतर आता कृषीमंत्री कोकाटे यांनी पुन्हा एक वादग्रस्त वक्तव्य केलं आहे.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची नाशिकमध्ये पाहणी करत असताना कोकाटे यांनी ढेकळांचे पंचनामे करायचे का ?, असं वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर राज्यभरातून टीकेची झोड उठली. यानंतर अखेर कृषीमंत्री कोकाटे यांनी आपल्या विधानावर स्पष्टीकरण देत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. तुझ्या शब्दाचा वेगळा अर्थ घेतल्याचं कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.



### कृषीमंत्री कोकाटे यांचं विधान काय होतं ?

'कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय करणार ? असा सवाल करत ढेकळांचे पंचनामे करायचे का', असा सवाल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केला होता. तसेच घरात आणून ठेवलेल्या मालाचे पंचनामे करता येणार नाहीत. शेतात नुकसान झालेले कांदा आणि अन्य जी पिके असतील, त्यांचे रितसर पंचनामे केले जातील, असं कृषीमंत्री कोकाटे यांनी म्हटलं होतं.

### मंत्री कोकाटेंनी कर्जमाफीबाबतही केलं होतं वादग्रस्त वक्तव्य

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कर्जमाफीच्या संदर्भात बोलताना काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. कर्जमाफीच्या मुद्यांवरून त्यांनी शेतकऱ्यांना सुनावलं होतं. माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांना सुनावल्याचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. त्यामध्ये त्यांनी म्हटलं होतं की, 'कर्ज घेता आणि पाच-दहा वर्ष कर्जमाफीची वाट पाहता, कर्जमाफीच्या पैशांनी काय करता ?', असं कृषीमंत्री कोकाटे यांनी म्हटलं होतं.

### माणिकराव कोकाटे काय म्हणाले ?

'सध्या शेतात कपाशी नाही, सोयाबीन नाही. आता फळबागा उभ्या आहेत आणि अवकाळी पावसामुळे फळबागांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालेलं आहे. पण तुझ्या शब्दाचा अर्थ तुम्ही वेगळा घेता त्याला मी काय करू ? आता ज्या शेतात काहीही नाही तेथील पंचनामे करून काय करणार ? पण कांद्यांच्या बाबतीत पंचनामे करण्याच्या सूचना मी दिलेल्या आहेत. ज्या-ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेलं आहे त्या-त्या ठिकाणी पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत', असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.

'तसेच अवकाळी पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचं नुकसान झालं, त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेल. ज्या शेतकऱ्यांच्या शेतात पिके आहेत त्यांना माझं वक्तव्य वेगळं वाटण्याचं काही कारण नाही. पण ज्या शेतकऱ्यांच्या शेतात पिके नाहीत त्याचे पंचनामे कसे करणार ? त्यामुळे जे खरं आहे तेच बोललो. शब्द चुकला असेल पण तुझ्या बोलण्याचा वेगळा अर्थ घेतला', असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.

# पंढरपूरच्या आषाढी वारीवर कोरोनाचे सावट

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** कोरोनाच्या रुग्ण संख्येत पुन्हा वाढ होत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. राज्यात अनेक भागात कोरोनाचे रुग्ण आढळून आल्यानंतर कोरोनाचा संसर्ग आता पंढरीच्या वेशीवर येऊ ठेपला आहे. माळशिरस तालुक्यातील अकलूज आणि माळीनगर येथे दोन नवे कोरोनाचे संशयित रूग्ण आढळून आले आहेत. यामुळे आषाढी वारीवर कोरोनाचे सावट निर्माण झाले आहे. या नव्या संकटामुळे आरोग्य विभाग देखील अलर्ट झाला आहे.

### माळशिरस तालुक्यात कोरोनाची एंट्री



जगात कोरोनाची महामारी पसरल्यानंतर २०२० व २०२१ या दोन वर्षात या महामारीत अनेकांना जीव गमवावा लागला आहे. यानंतर महामारी कमी झाली असताना कोरोनाचे नवीन व्हेरिएन्ट आले. मात्र यातून जग सावरत असताना आता पुन्हा कोरोनाचे संकट उभे राहिले आहे. राज्यातील पुणे, मुंबई, सोलापूरमध्ये कोरोनाचे रुग्ण आढळून आले आहे. दरम्यान कल्याणमध्ये कोरोनामुळे दोघांना मृत्यू देखील झाला आहे. यामुळे राज्यातील आरोग्य यंत्र अलर्ट झाली आहे.

आषाढी वारीवर कोरोनाचे सावट दरम्यान आषाढी एकादशीसाठी येत्या १८ जून रोजी संत तुकाराम महाराज तर १९ जूनला संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. या पालखी सोहळ्यात लाखो भाविक सहभागी होतात. तर येत्या ६ जुलैला आषाढीचा मुख्य सोहळा पंढपुरात साजरा होणार आहे. आषाढी वारीसाठी देशभरातून लाखो भाविक पंढरीत विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी येतात. मात्र माळशिरस तालुक्यात कोरोनाचे दोन रुग्ण आढळून आल्याने आषाढी वारीवर कोरोनाचे सावट पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दोघांवर खासगी रुग्णालयात उपचार आता संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील अकलूज आणि माळीनगर या गावात कोरोनाचे रूग्ण आढळून आल्याने चिंता वाढली आहे. या दोन्ही संशयित कोरोना बाधीत रूग्णांवर खासगी रूग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती माळशिरसच्या वैद्यकीय अधिकारी प्रियंका शिंदे यांनी दिली.

# ५४ मीटर रस्त्याचा मार्ग अखेर मोकळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराज चौक ते सीएनएस हॉस्पिटल दरम्यानच्या ५४ मीटर रस्त्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. दमाणी नगर येथील १०३ वर्षे जुना दगडी रेल्वे पुल लवकरच रेल्वे प्रशासन आणि NHAI मार्फत पाडण्यात येणार असून, त्यानंतर उद्भवणाऱ्या गंभीर ट्राफिक समस्येचा पर्याय म्हणून हा रस्ता महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



या मार्गासाठी सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी गेले चार वर्षे सातत्यपूर्ण व अभ्यासपूर्ण पाठपुरावा करून सोलापूर महापालिका प्रशासन व तत्कालीन पालकमंत्री यांचे लक्ष वेधले. मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, केतन शहा, विजय कुंदन जाधव, ॲड. दत्तात्रय अंबुरे आणि मनोज क्षिरसागर,सुहास भोसले, आनंद पाटील यांनी महापालिका अधिकारी व तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासोबत अनेक बैठका घेतल्या. त्यानंतर या रस्त्यासाठी DPDC अंतर्गत भरघोस निधीची तरतूद करण्यात आली.

या मार्गातील अडथळा असलेल्या देशमुख पाटील वस्तीतील अनधिकृत १८ घरांवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या नेतृत्वाखाली कारवाई केली. त्यामुळे आता हा रस्ता रहदारीसाठी लवकरच खुला होणार आहे. सोलापूर विकास मंचच्या या महत्त्वपूर्ण भूमिकेमुळे संपूर्ण शहराला दिलासा मिळणार आहे. आता मंचचे लक्ष सीएनएस हॉस्पिटल ते विजापूर रोड मार्ग पूर्ण करून संपूर्ण रिंगरोड विकसित करण्यावर आहे. तसेच नुसता हा रस्ता CNS Hospital पर्यंत करून भागणार नाही तर तो रस्ता सोरेगाव पर्यंत जेव्हा होईल तेव्हाच रेल्वे ब्रिज पाडले तरी याचा काहीही परीणाम वाहुतुक वर व छत्रपती संभाजी महाराज चौक मधुन सगळी वाहतूक बाहेरून विजापुर व आसरा जुळे सोलापूर भागाकडे व्यवस्थित जाईल.

सोलापूर विकास मंचने सोलापूरकरांच्या वतीने तत्कालिन पालकमंत्री चंद्रकांत पाटील आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे, नगर अभियंता सारिका अकुलवार, सहायक अभियंता प्रकाश दिवाणजी आभार मानले.





सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणेतून मिळेल विकासाची नवी दिशा!

- चौंडी येथील स्मृतिस्थळाचा तीर्थस्थळ विकास आराखड्यात समावेश, यासाठी ६८१.३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर; आणखी ७ तीर्थस्थळांचा विकास प्रस्तावित
- ऐतिहासिक जलस्रोतांच्या जतन व संवर्धनासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर; आणखी ३४ जलस्रोतांचे पुनरुज्जीवन व सुशोभीकरण करून इतिहासाला नवसंजीवनी देण्यात येणार
- अहिल्यानगर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अत्याधुनिक रुग्णालयाची स्थापना करण्यात येणार; १०० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व ४३० खाटांचे रुग्णालय लवकरच उभारण्यात येणार
- धनगर समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृह योजनेचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना' असे करण्यात येणार
- नारी शक्तीचा जागर करण्यासाठी, महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान' आणि 'आदिशक्ती पुरस्कार योजना' राबविणार
- अहिल्यानगर येथे मुलींसाठी विशेष शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणार
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित बहुभाषिक चित्रपटाची निर्मिती करण्यात येणार

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !



एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in | MaharashtraDGIPR | MahaDGIPR

# टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथील खुनाचा प्रयत्न करणाऱ्या दोन सराईत फरार आरोपींना अटक

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या हद्दीत सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या मौजे अकुंभे ता. माढा या गावातील राहणारे ( दिनांक 03/05/25 रोजी) फिर्यादी दत्तात्रय रामदास ढवळे वय (50) वर्षे यांनी टेंभुर्णी पोलीस स्टेशनला आरोपीत इसमांनी बदली भाड्याच्या पैशांचे कारणावरून फियार्दी,व त्यांचा मुलगा व पत्नी यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला या बाबत फिर्याद दिली होती. त्यावरून आरोपी यांच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम 109 वगैरे प्रमाणे दिनांक 04/05/2025 रोजी टेंभुर्णी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.




सदर गुन्ह्या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी करमाळा विभागीय अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलीस ठाण्यातील तपासासाठी एक पथक तयार करून तपासाची चक्र जोरदार फिरवली व अवघ्या वीस दिवसात पथकाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दोन आरोपीला अटक करण्यात आली.

सदर गुन्ह्यात आरोपी क्रमांक 1) महेश वैजनाथ पाटील यास दि.04/05/25 रोजी तात्काळ अटक करण्यात आली होती. गुन्ह्यातील दोन आरोपी आरोपी क्र. 2) हिम्मत वैजनाथ पाटील व 3) अनंत वैजनाथ पाटील हे दोघे फरार होते. सदर दोन सराईत फरार आरोपींचा दिनांक 25/05/2025 रोजी नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आली असून.सदर आरोपी यांना माढा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दिनांक 31/05/2025 रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक, sdpo करमाळा पोलीस निरीक्षक नारायण पवार यांचे मार्गदर्शनाखाली ए पीआय गिरीश जोग, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पथकातील प्रमुख पोलीस हवालदार 1555/ पर्वते, पोलीस शिपाई 2192/ क्षीरसागर, पोलीस शिपाई 2145/ इंगोले,पोलीस शिपाई 838/अनभुले, सायबर पोलीस ठाणे कडील पोलीस हवालदार 222/ मोरे यांनी कामगिरी केल्याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्यांच्या अभिनंदन करण्यात आले.

# पंचनामे करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही- खा. प्रणिती शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी गाव भेट दौरा दरम्यान मोहोळ तालुक्यातील वरकुटे, वडदेगाव गावातील गावकऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या. शेतकऱ्यांशी संवाद साधला. गाव भेट दौऱ्याला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

आगामी काळात देखील मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असल्याचे वचन दिले.

यावेळी बोलताना म्हणाले की, गावातील नॉन प्लॅन चे रस्ते प्लॅन घ्या म्हणून ग्रामपंचायतीने प्रस्ताव दिले तरी अधिकारी दखल घेत नाहीत त्यांचा बंदोबस्त करणार असल्याचे सांगितले. तसेच सोलापूर जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालंय. अधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामे करावीत. पंचनामे करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही. पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांचा छळ होतोय. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरकारने तातडीने मदत करण्याची मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.



या गावभेट दौऱ्यात मोहोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी, सोलापूर जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश अप्पा पवार, वडदेगावचे सरपंच माणिक सुरवसे, बजरंग शेंडेकर, महादेव सुरवसे, नागनाथ सुरवसे, गणेश शेंडेकर, विलास पवार, तुकाराम सुरवसे, मारप्पा आठवले, शिवाजी सुरवसे, सौ शालन वराडे, बाळासाहेब पाटील, आरिफ पठाण, वरकुटे चे मा. सरपंच राजश्रीताई बंडगर, दत्तात्रय बचुटे, हरिदास बंडगर गुरुजी, सुभाष सोलनकर, धनाजी बसाटे, सिध्देश्वर बचुटे, सत्यवान माने, अप्पासाहेब पाटील, अलकाताई ओहोळ, सतीश बचुटे, रामभाऊ सोलनकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौंडी येथील विकास आराखड्यासाठी ६८१ कोटी रू. मंजूर

## राष्ट्रवादीच्या बैठकीत अभिनंदनाचा ठराव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती निमित्त राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सुचनेनुसार सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली विविध फ्रंटल सेल विभागाच्या वतीने सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याची पूर्वनियोजित बैठक गुरुवारी राष्ट्रवादी भवन कार्यालयात आनंदी वातावरणात संपन्न झाली.

सुरुवातीला मौजे चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळ विकास आराखड्यासाठी तब्बल ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल राष्ट्रवादीकडून शहर - जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी महायुती सरकारचे आणि अजितदादा पवार यांचे विशेष अभिनंदनाचा ठराव टाळ्याच्या गजरात मंजूर करण्यात आला.




तसेच प्रदेश पक्षस्तरावर मुख्य संघटन निवडणूका व प्रशासनाची जबाबदारी आमदार शिवाजीराव गर्जे, तसेच सर्व फ्रंटल सेल मिडीया जबाबदारी आनंद परांजपे, उर्वरित सर्व विभाग व प्रमुख नेत्यांचे दौरे पूर्वतयारी करणे जबाबदारी लतिफ तांबोळी, सोशल मीडिया समन्वयक सह कोषाध्यक्ष संजय बोरगे,मीडिया समन्वयक व नेत्यांच्या पक्ष कार्यालयातील व दौऱ्याच्या पत्रकार परिषदांचे नियोजन संजय तटकरे यांच्यावर राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी नुकतीच जबाबदारी निश्चित केल्याबद्दल सोलापूर शहर राष्ट्रवादीच्या वतीने अभिनंदनचा ठराव एकमताने मंजूर झाला.

प्रसंगी ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे,ज्येष्ठ नेते अनिल उकरंडे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, प्रदेश सरचिटणीस फारुक मटके, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, अल्पसंख्याक अध्यक्ष अमीर शेख, VJNT सेल विभाग अध्यक्ष रूपेशकुमार भोसले, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, सहकार सेल विभाग अध्यक्ष भास्कर आडकी, OBC सेल विभाग अध्यक्ष अनिल छत्रबंद,कार्याध्यक्ष आयुब शेख, सांस्कृतिक व नाट्य विभाग अध्यक्ष आशुतोष नाटकर, सोशल मीडिया विभाग शहराध्यक्ष वैभव गंगणे, कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे, महिला आघाडी उत्तर विधानसभा अध्यक्ष उमादेवी झाडबुके, मध्य विधानसभा अर्चना दुलंगे, सरचिटणीस सुरेखा घाडगे, जयश्री झाडबुके, सुजाता काकडे, अल्पसंख्याक विभाग मध्य विधानसभा अध्यक्ष अशपाक कुरेशी, दक्षिण विधानसभा अध्यक्ष श्रीकांत वाघमारे,शहर सचिव दत्तात्रय बनसोडे,निशांत तारा नाईक अल्पसंख्याक विभाग कार्याध्यक्ष संजीव मोरे, नवरेज सज्जाद जहागिरदार, मुकुंद व्यास, यांच्यासह सर्वच प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरणादायी - समीर गायकवाड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरणादायी आहे. असे मत साहित्यिक समीर गायकवाड यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जयंती निमीत्त साहित्यिक समीर गायकवाड यांचे राजमाता आहिल्यादेवी होळकर आणि त्यांचा जीवन प्रवास या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करणेत आले होते.

जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात घेणेत आलेले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थांनी सिईओ कुलदीप जंगम हे होते.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची 300 वी जयंती ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूरच्या वतीने दिनांक 30 मे 2025 रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात साजरी करण्यांत आली . मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या शुभहस्ते प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करणेत आले. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर , उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मनिषा वाकडे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, लेखाधिकारी पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, लेखाधिकारी श्रीकांत मिरगळे, प्रकाश शेंडगे,रणजीत घोडके, अमित सलगर, सुहास चेळेकर , शंकर बंडगर, सचिन घोडके,संतोष जाधव,रविद्र करजगी उपस्थित होते.




### पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे सामाजिक व धार्मिक कार्य दिशादर्शक - गायकवाड

राजे मल्हारराव होळकर यांनी अहिल्यादेवींना मुलगा मानले. त्यांना सती जाणे पासून प्रवृत्त केले. त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांना प्रेरणा मिळून विविध सामाजिक कार्ये केली. समाजातील अनेक वाईट प्रथा त्यांनी बंद केल्या. १७६५ मध्ये मल्हारराव यांचे निधन झाले. त्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या खचल्या नाहीत. एखादी स्त्री किती दुरदृष्ट्रीची असते याचा प्रत्यय अहिल्यादेवी यांचे कर्तृत्व पाहून समजते. अहिल्यादेवी यांचे आवाहनास साद देत चोरांचा बंदोबस्त करणारे व्यक्तीस मुलीचे लग्न लावून देणार असे आवाहन केले. या आवाहनास साद देत यशवंतराव फणसे यांनी चोराचा बंदोबस्त केला. त्यांनी फणसे यांना स्वत ची मुलगी दिली. पुण्यश्लेक अहिल्यादेवी यांचे समोर नातेवाईक महिला सती गेल्या. आज समाजात छोट्याशा घटनेवरून माणसे विचलीत होतात. मात्र त्यावेळी अहिल्यादेवी विचलीत झाले नाहीत. या सर्व बाबी लक्षात घेता. त्या कालावधीत रक्तातील कर्तबगार माणसे मरण पावली तरी त्या खचल्या नाहीत.असेही साहित्यीक समीर गायकवाड यांनी सांगून राजमाता अहिल्यादेवी होळकर आणि त्यांचा जीवन प्रवास या विषयावर विविध प्रसंग सांगितले. महेश्वर चा घाट ब्रिटीश कालीन बांधकामा पेक्षाही चांगला आहे. विविध घाट व जिर्णोध्दाराची कामे केली. अनेक ठिकाणी त्यांनी आपल्या नावाचा कुठे उल्लेख केलेला नाही. अहिल्यादेवी यांनी नावा साठी काम केले नाही. आज काहीही काम न केलेली माणसे चमकोगिरी करत असल्याचे गायकवाड यांनी स्पष्ट शब्दात सांगितले.

या कार्यक्रमासाठी ओम बुरसे, गणेश साळुंखे, गणेश कलुबर्मे, श्रीमती राजश्री रोजी, श्रीम स्मिता पोरेडी, योगेश म्हमाणे, किरण निमसे, प्रविण चव्हाण, विनायक कदम, एम जे कलादगी यांनी परिश्रम घेतले. कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी आभार मानले.

# सोलापूर जिल्ह्याला घरकुलांचा कोटा वाढवून मिळावा

## खा. धैर्यशिल मोहिते पाटील यांची गया प्रसाद यांचेकडे मागणी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) २०२४-२५ अंतर्गत माढा लोकसभा मतदारसंघातील गरीब व गरजू कुटुंबांसाठी सोलापूर जिल्ह्याला घरकुलांचा कोटा वाढवून मिळावा, यासाठी माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या ग्रामीण गृहनिर्माण विभागाचे उपमहानिदेशक गया प्रसाद यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

यावेळेस खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढा लोकसभा मतदार संघातील ग्रामीण भागात अद्यापही मोठ्या प्रमाणात गरीब, वंचित व शेतकरी कुटुंबांना घराची आवश्यकता असल्याचे अधोरेखित केले. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेतून अधिक घरकुले मंजूर करून कोटा वाढविण्याची विनंती त्यांनी केंद्र सरकारकडे केली.

यामुळे माढा मतदारसंघ व सोलापूर जिल्ह्यातील हजारो गरजू कुटुंबांना कायमस्वरूपी निवास उपलब्ध होईल आणि त्यांचा जीवनमान उंचावण्यास मोठा हातभार लागेल, असे खासदार मोहिते-पाटील पाटील यांनी व्यक्त केले.

# काढणीपश्चात व्यवस्थापनासाठी अर्थसहाय्य योजना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याच्या कृषी उत्पादनात फलोत्पादन पिकांचा महत्वाचा वाटा आहे. फलोत्पादन पिकांचे मुल्यवर्धन प्रक्रिया करून शीतगृहांमध्ये साठवणूक करून फलोत्पादन पिकांचे पदार्थ वर्षभर सर्व हंगामात उपलब्ध होऊ शकतात. यासाठी काढणीपश्चात व्यवस्थापन कार्यक्रम, पणन सुविधा व प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी शासनाकाडून अर्थसहाय्य देण्यात येते काढणीपश्चात व्यवस्थापन कार्यक्रम पणन सुविधा व प्रक्रियांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकांचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashrta.gov.in या संकेतस्थळावर फलोउत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे

सोलापूर जिल्ह्यात प्राथमिक प्रक्रिया केंद्र, एकात्मिक शीतसाखळी प्रकल्प व कांदाचाळ या घटकांसाठी लक्षांक प्राप्त झालेला आहे. एकात्मिक काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्राथमिक प्रक्रिया केंद्र या घटकासाठी (एमआयडीएच योजनेच्या इतर घटकांसोबत जोडलेला असावा.) खर्च मर्यादा रुपये 35 लाख प्रति युनिट असून, अनुदान मयार्दा ग्राह्य भांडवली खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी 35 टक्के व कमाल रुपये 12 लाख 25 हजार आणि अनुसूचित क्षेत्रासाठी 50 टक्के व कमाल रुपये 17 लाख 50 हजार बँक कजार्शी निगडीत असेल. तसेच एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पासाठी खर्च मयार्दा रुपये 10 कोटी प्रति प्रकल्प, ग्राह्य भांडवली खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी 35 टक्के व कमाल रुपये 3 कोटी 50 लाख आणि अनुसूचित क्षेत्रासाठी 50 टक्के व कमाल रुपये 5 कोटी बँक कजार्शी निगडीत आहे.

प्राथमिक प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्प योजनेसाठी घटकांसाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादनक गट, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहायता गट नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये किमान 25 सदस्य असतील) शेतकरी उत्पादक कंपनी, महानगरपालिका, सहकारी संस्था, सहकारी मार्केटिंग फेडरेशन, लोकल बॉडी, कृषि उत्पन्न बाजार समिती, पणन मंडळ, शासकीय विभाग, ग्रामपंचायत पात्र आहे.

तसेच 5, 10, 15, 20 व 25 मेट्रीक टन कांदाचाळीसाठी 10 हजार प्रति मेट्रीक टन खर्च मर्यादेसाठी, 5 हजार प्रति मेट्रीक टन अनुदान मर्यादा आहे. 25 ते 500 मेट्रीक टन कांदाचाळीसाठी 8 हजार प्रति मेट्रीक टन खर्च मर्यादेसाठी 4 हजार प्रति मेट्रीक टन अनुदान मयार्दा आहे. 500 ते 1000 मेट्रीक टन कांदाचाळीसाठी 6 हजार प्रति मेट्रीक टन खर्च मर्यादेसाठी 3 हजार प्रति मेट्रीक टन अनुदान मर्यादा आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वतःच्या मालकीची जमीण असणे आवश्यक व 7/12 उताऱ्यावर, स्वतःचे कांदा पिक असणे आवश्यक सदर योजनेचा लाभ वैयक्तीक कांदा उत्पादक शेतकरी, शेतकऱ्यांचा गट, स्वयंसहाय्यता गट, शेतकरी महिला गट, शेतकऱ्यांचे उत्पादक संघ, नोंदणीकृत शेतीसबंधी संस्था, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था व सहकारी पणन संघ यांना घेता येईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109


(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# तरंगेवाडी (जवळा) येथे १३ वर्षीय मुलीची आत्महत्या

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** मौजे तरंगेवाडी (जवळा ) ता. सांगोला येथे एका १३ वर्षीय मुलीने अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना दिनांक २६ मे रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी दिनांक २७ मे रोजी अनिता आबासो वाघमोडे रा. मुळ गाव भोसे ता. मंगळवेढा जि. सोलापुर सध्या रा. तरंगेवाडी -जवळा ता. सांगोला यांनी सांगोला पोलीसात खबर दिली असून ऋतुजा आबासो वाघमोडे (वय १३) असे गळफास घेतलेल्या मुलीचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, खबर देणार यांची मुलगी ऋतुजा ही जिल्हा परिषद शाळा तंरगेवाडी- जवळा येथे शाळेला होती, सध्या शाळेला सुट्या असल्याने ती घरीच होती. दिनांक २६ मे रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास खबर देणार ह्या व सोबत मुलगी तनुजा व मुलगा युवराज यांच्यासोबत शेळ्या चारण्यासाठी शेतामध्ये गेल्या होतो. त्यावेळी जाताना मुलगी ऋतुजा ही घरी एकटीच होती. त्यानंतर सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास खबर देणार ह्या घरी आल्या असता घरासमोर असलेल्या लिंबाच्या झाडाला मुलगी ऋतुजा हीने दोरीच्या साह्याने लिबांच्या झाडाला गळफास घेतला दिसून आले. सदरची घटना दिनांक दिनांक २६ मे रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान घडली असल्याचे असे पोलीसात दिलेल्या खबरीत म्हंटले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :**
१) बॉलीवूडचा महानायक
२) जवळ
३) शर्टवरील अंगरखा
४) शंभू महादेवाचा वार
५) पूर्ण शुध्द असे सोने
६) मुस्लीम बांधवांचा एक सण
८) तानाजी मालुसरे यांच्या मुलाचे नाव
१०) नगरपालिकेत निवडून दिलेला
१२) पलीकडे, पल्याड १३) मनावरील बोझा, दबाव
१४) सैन्याचा मुक्काम, बूड, खालचा भाग १६) सोने
१८) नरक
१९) पवित्र मनाने देणे , ** करणे
२१) मिठाची चव
२३) अवजड
२४) दागिना, ठपका
२५) कुटील हेतू
२६) माशाचा एक प्रकार
२८) खिडकीचे काचेचे बाहेरील आवरण
३०) कपाळभर लावलेले कुंकू
३३) आकाश
३४) फळातील गोड द्रव, ज्यूस
३५) सज्जन मनुष्य
३७) मानसिक केलेला छळ

**आडवे शब्द :** १) छ. संभाजीराजांची भूमिका साकारणारा अभिनेता, शिरूरचे राष्ट्रवादीचे खासदार
४) छ. शिवरायांची दुसरी पत्नी ७) व्यक्तींचा समूह, विभाग
८) दशरथपुत्र ९) तोंड, मुख
११) मांत्रिक गळ्यात घालतात तो
१२) पायी जाणारा मार्ग
१३) राजाचा सभामंडप १४) नशीब (हिंदीत)
१५) वायफळ बोलणे १६) छोटा हंडा १७) प्रार्थनेदरम्यान म्हणतात ते २०) गाव करील ते ** काय करील २१) ** तशी माती
२२) मनातील ओळखणारा २५) हात २६) उत्तीर्ण २७) विश्व
२८) रागीट २९) मेडल ३०) ** वसे ते स्वप्नी दिसे ३१) दरारा, दबदबा
३२) छ. शिवरायांविषयी आक्षेपार्ह लेखन करणारा विदेशी लेखक - जेम्स **
३३) गोंधळ ३४) आडातून पाणी काढण्यासाठी पूर्वी वापरला जाणारा लाकडी गोलाकार ३५) समुद्र ३६) बेरीजच्या विरूध्दार्थी
३८) देवाजवळ बोलतात तो, देवाला घातलेले मागणे ३९) श्रावण (हिंदीत) ४०) स्पर्श (इंग्रजीत).

## सुडोकु - 263

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 1 | | | 6 | | | 7 | |
| | | 3 | | 8 | 5 | | | 9 |
| | 2 | | 3 | 7 | | 5 | | 1 |
| | 3 | | 6 | | 9 | 2 | 5 | |
| 6 | | | 5 | | 1 | | | |
| | | 9 | | 2 | | | | 3 |
| | | 6 | 2 | | | 7 | 4 | 5 |
| | | | 4 | | 6 | 8 | | |
| 2 | 8 | 4 | | | | 1 | 9 | 6 |

# नुकसानग्रस्त पिकांचे तात्काळ पंचनामे करून अहवाल सादर करावा - कृषी मंत्री कोकाटे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यासह पंढरपूर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सतत मान्सूनपूर्व पाऊस पडत असल्याने फळबागांचे व शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, या नुकसानग्रस्त पिकांचे तात्काळ पंचनामे करून अहवाल शासनास सादर करावा अशा सूचना कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिल्या.



मान्सूनपूर्व पावसामुळे नुकसान झालेल्या पद्माकर बागल, कोर्टी (ता. पंढरपूर) यांच्या कलिंगड पिकाची पाहणी कृषिमंत्री श्री कोकाटे यांनी पाहणी केली. यावेळी मान्सूनपूर्व पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करावेत. तसेच कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी श्री बागल यांच्या कलिंगड प्लॉट संबंधी लागवडीपासून ते आत्तापर्यंत झालेल्या खर्चाची माहिती घेतली. तसेच उपस्थित शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासन सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी राहील अशी कृषिमंत्री श्री कोकाटे यांनी ग्वाही दिली.

यावेळी पंढरपूर तालुक्यात मे महिन्यातील सरासरी पाऊस 20 मी.मी एवढा आहे परंतु आज अखेर 138 मिलिमीटर एवढा पाऊस झाल्याने तालुक्यातील 115 शेतकऱ्याची 65.99 हेक्टर क्षेत्र वरील नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर केल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत मोरे यांनी दिली.

तसेच बागल यांनी कृषिमंत्री कोकाटे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत आल्याचे समाधान व्यक्त करून सदर कलिंगड प्लॉट पाऊस चालू होण्यापूर्वी 13 रुपये प्रति किलो प्रमाणे व्यापाऱ्याकडून मागणी झाल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले परंतु सततच्या अवकाळी पावसामुळे सदर प्लॉट सध्या परिस्थितीमध्ये 2 रुपये प्रति किलो एवढ्या कमी दराने मागण्यात येत असल्याचे सांगितले. तरी शासनाने त्वरित नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी यावेळी केली.

सदर पाहणी दौऱ्यास जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत बागल, चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, चंद्रकांत बागल, दत्तात्रय बागल, सुभाष बागल, अण्णा फाटे, अतुल फाटे आदी उपस्थित होते.

# वळवाच्या पावसाने बार्शीत पिकांचे नुकसान

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यात पडलेल्या पावसाने तालुक्यातील अनेक गावांत शेतकर्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तालुक्यातील भातंबरे येथील बाळासाहेब सोपान झोंबाडे यांच्या शेतातील एक एकर मिरची पीक पूर्णपणे पाण्यात जाऊन मोठे नुकसान झाले आहे.



शेतामधील माती वाहून गेली असल्यामुळे शेतीचेही नुकसान झाले आहे. प्रशासनाने लवकरात लवकर नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून भरपाई मिळावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमधून होत आहे.

उपळाई (ठो) येथेही ढगफुटीसदृश झाल्याने शेताला तळ्याचे व रस्त्याला कॅनालचे स्वरूप प्राप्त झाले होते. येथील संतोष पाटील या शेतकर्याने पर्जन्याचे मोजमाप केले असता, पर्जन्य मापकामध्ये 131 मिली नोंद आढळून आली. सुमारे दोनच तासात एवढा मोठा पाऊस मे महिन्यात पहिल्यांदा पडल्याचे वयस्कर शेतकरी सांगत होते. पडलेल्या पावसामुळे नवीन छाटणी केलेल्या द्राक्ष बागा, केळी, पपई, टोमॅटो ऊस भाजीपाला पिकांचे प्रचंड नुकसान झाले.

रमेश पाटील यांची अंबा पिकाची झाडे ही वादळामुळे उपटून पडली आहेत. खराडे यांच्या टोमॅटो पिकाचे ही नुकसान झाले तरी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनच्या निकषाप्रमाणे पंचनामे होऊन नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी सरपंच मधुकर वैध, उप सरपंच मीनल ठोंगे यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.

कांदलगाव परिसरात झालेल्या अतिवृष्टी सदृश्य पावसाने नदीला पूर आला होता शेतामध्ये तलावाचे स्वरूप निर्माण झाले होते तसेच पावसाने अनेक शेतकर्यांच्या शेतातील माती वाहून गेले आहे. शेतातील तालीही फुटून मोठी हानी झालेली आहे. बार्शी तालुक्यातील बाभुळगाव येथे मुसळधार पावसामुळे माजी उपसरपंच चेतन अशोक शिंदे यांची 60 फूट विहीर पूर्णपणे बुजून गेली आहे. जमिनीच्या समांतर ही विहिर भरली आहे. अतिवृष्टी सदृश्य झालेल्या पावसामुळे तालुक्यातील कोरफळे ते श्रीपतपिंपरी दरम्यान सुरू असलेले खडीकरणाचे काम वाहून गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

# पावसामुळे ३५ टँकर झाले कमी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात गेल्या दहा दिवसांपासून पाऊस पडत आहे. त्यामुळे टँकरची संख्या ६९ वरुन ३४ इतकी झाली असून, ३५ पाण्याचे टँकर बंद झाले आहेत. येत्या काळात पाऊस असाच सुरू राहिल्यास टँकर आणखी घटणार आहेत. सध्या जिल्ह्यातील ३२ गावांतील ३३८ वाड्यावरील ८० हजार २०६ लोकांना, ३७ हजार जनावरांना ३४ शासकीय टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.



पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास येत्या काही दिवसात टँकरच्या संख्येत घट होणार असल्याची माहिती ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दिली. दरम्यान, चार दिवसांपूर्वी जिल्ह्यातील ५९ गावे, ५८७ वाड्यांतील एक लाख ४५ हजार ९९० लोकांना, ६० हजार जनावरांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. मात्र, गेल्या दहा दिवसापासून जिल्ह्यात सातत्याने पाऊस पडत असल्याने पाणीपातळीत वाढ होत आहे. त्यामुळे गावे, वाड्यांवरील ३५ टँकर बंद करण्यात आले आहेत.

**तालुकानिहाय टँकर**

सांगोला - ३, मंगळवेढा - ६, माढा - १, करमाळा ७, माळशिरस ८, मोहोळ - ०, पंढरपूर- ०, बार्शी - ०, दक्षिण सोलापूर- ५, अक्कलकोट - २ उत्तर सोलापूर - २, एकूण - ३४ जिल्ह्यात ६९ टँकरने दीड लाख नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात येत होता. मात्र, मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात चांगला पाऊस पडत असल्याने पाणी पातळी वाढली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ३४ टँकर बंद करण्यात आले आहेत.

**- संजय धनशेट्टी,** कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

# बिल काढण्यासाठी लाचेची मागणाऱ्या बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपिकावर गुन्हा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कामाचे बिल काढण्यासाठी ५ हजार रुपयांची लाचेची मागणी केल्याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सोलापूर येथील कार्यकारी अभियंता कार्यालयातील वरिष्ठ लिपिकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. शंकर काशीनाथ कवठे (रा.सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या त्याचे नाव आहे.

यातील तक्रारदार हा पीडब्ल्यूडी येथील मक्तेदार आहे. त्यांनी दक्षिण सोलापूरतालुक्यातील मौजे हत्तुर येथील चर्मकार वस्ती येथे भूमिगत गटार व सिमेंट रस्ता करणे असे काम केले होते. या कामाचे एकूण बिल हे ४ लाख २४ हजार ७५९ रुपये इतके आहे.

त्या बिलापैकी २ लाख ५० हजार रुपयांचे बिल काढून देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता कार्यालयातील वरिष्ठ लिपिक शंकर कवठे याने तक्रारदार यांच्याकडे साहेबांच्या नावाने ५ हजार रुपये लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली होती. याबाबत सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदविली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पुणे येथील पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, खराडे, यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधीक्षक गणेश कुंभार यांनी चौकशी व तपास केला असता आरोपीने लाचेची मागणी करून लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे दिसून आले.

आरोपी विरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. पोलिसांनी भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ आणि ७ अ प्रमाने गुन्हा दाखल केला याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आरोपीस ताब्यात घेतले आहे.

# कृषी सहायक कामावर; पंचनामे, खरीप मोहिमेला वेग; 'संपामुळे हंगामाच्या तोंडावर विविध कामांचा खोळंबा'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विविध मागण्यांसाठी कृषी सहायक संपावर गेल्याने ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर २२ दिवस कृषी कार्यालयाकडील विविध कामे खोळंबली होती. राज्य सरकारने मागण्या मान्य केल्यामुळे ते बुधवार (ता. २८) पासून कामावर रुजू झाले आहेत. त्यानंतर पूर्वमोसमी पावसाने झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्यासह खरीप मोहिमेला वेग आला आहे.



प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरातील कृषी सहायक पाच मे पासून संपावर गेले होते. जिल्ह्यात ४२ मंडलांत ५०४ व मुख्यालयासह तालुका कार्यालयांत ३० असे एकूण ५३४ कृषी सहायक आहेत. त्यामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर कृषी विभागाकडील कार्यालयीन कामकाजासह मंडल स्तरावरील कामकाज ठप्प झाले होते. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बीज उगवण क्षमता तपासणी, बीजप्रक्रिया मोहीम थंडावली.

विशेष म्हणजे याच काळात पूर्वमोसमी पावसाला सुरवात झाली. या पावसामुळे शेतीसह फळबागांचे मोठे नुकसान झाले. मात्र, जिल्ह्यात पंचनामे होऊ शकले नाहीत. पाऊस पडत राहिल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी सुरू केली. पण कृषी विभागाकडून मार्गदर्शन मिळणे दुरापास्त झाले होते. लांबलेला पाऊस आणि मिटलेला संप यामुळे शेतकऱ्यांची अडचण दूर झाली. बुधवारपासून कृषी सहायकांनी पंचनाम्यासह मोहिमेअंतर्गत शेतकऱ्यांना बीज उगवण क्षमता तपासणी, बीजप्रक्रिया याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन सुरू केले आहे.

साडेतीन हजार हेक्टर पिकांचे नुकसान पूर्वमोसमी पावसाने जिल्ह्यात आंबा, केळी व पपई या फळपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात एकूण तीन हजार ७०० हेक्टर पिकांचे नुकसान झाले आहे. अजून पंचनामे सुरू असून त्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

संप मिटल्यानंतर जिल्ह्यातील कृषी सहायक कामावर रुजू झाले आहेत. पूर्वमोसमी पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरू आहेत. त्याचा प्राथमिक अहवाल आला आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर प्रात्यक्षिकासह शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जात आहे.

# ऐन उन्हाळ्यात शिंगणापुर, गुप्तलिंग येथील निसर्गसौंदर्य खुलले



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** उजाड माळराने ओसाड डोंगर अशी ओळख असलेल्या मान तालुक्यात यावर्षी चक्क मे महिन्यात निसर्गसौंदर्य खुलले आहे. मान्सून पूर्व पावसाने शिखर शिंगणापूर व गुप्तलिंग परिसर उन्हाळ्यात हिरवाईने नटला आहे. तुडुंब भरलेले पुष्कर तलाव, बंधारे विहिरी तसेच सोलापूर जिल्हा हद्दीत असणाऱ्या गुप्तलींग परिसरात डोंगरातून वाहणारे धबधबे पाहण्यासाठी भाविक भक्तांची मोठी गर्दी होत आहे. शिंगणापूर येथील गुप्तलिंग परिसरात शंभू महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. पावसाळ्यात हिरवा गार परिसर पाहण्यासाठी भाविक पर्यटकांची या ठिकाणी गर्दी होत असते यावर्षी मात्र ऐन उन्हाळ्यात झालेल्या पावसामुळे गुप्तलिंग परिसरातील निसर्गसौंदर्य चांगलेच भरले आहे. खोल दरीत असलेले शंभू महादेवाचे दर्शन घेण्याबरोबरच उंच डोंगरातून कोसळणारा धबधबा, कडे कपारीतून वाहणारे झरे, गोमुखातून पडणारे पाणी, दाट झाडी, डोंगराच्या कुशीत हिरवाईने नटलेला परिसर पाहण्यासाठी भाविक पर्यटकांची वर्दळ वाढत आहे. स्थानिक नागरिक ही उन्हाळ्यातील पावसाळी पर्यटनासह येतील निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी गुप्तलिंग परिसरात येत आहेत.

# पंढरपूर तालुक्यात ९५०० हेक्टरवर खरीप पेरणीची तयारी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यात पूर्व मोसमी पावसाने सर्वदूर जोरदार हजेरी लावली आहे. पंढरपूर तालुक्यात सरासरी १६२ मिलिमीटर नोंद झाली आहे. तालुक्यातील ९ मंडलात कमी जास्त पावसाची नोंद झाली आहे. मान्सून सुरू होण्या अगोदरच पाऊस तालुक्यात जोरदार बरसला आहे. शेतामध्ये सर्वत्र पाणीच पाणी झाले. शेतकरी आता जमिनीला वाफसा कधी येतो, याची वाट पाहत असून खरीप पेरणीची तयारी करु लागले आहेत. ९५०० हेक्टरवर खरीप पेरणीची तयारी करण्यात आली आहे.



पंढरपूर तालुक्यात झालेल्या पावसामुळे ऊस पिकाला चांगला फायदा झाला आहे. तालुक्यात ऊसाबरोबरच फळबागांचे प्रमाण खूप आहे. त्यामुळे पावसाबरोबरच आलेल्या वादळी वाऱ्यामुळे केळी, डाळिंब, बोर यांना फटका बसला आहे. तर पपईच्या बागा भुईसपाट झाल्या आहेत. त्यामुळे या फळबागांना मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. जवळपास १५० शेतकऱ्यांचे १०० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच मका व बाजरीचेही नुकसान झाले आहे. आता आंब्याचा सिझन शेवटच्या टप्प्यात आला आहे. तालुक्यात झालेल्या पावसामुळे आंब्याच्या दरात मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. पावसाळा चालू असल्यामुळे आंब्याची विक्री ही घटली आहे.

यावर्षी पहिल्यांदाच उन्हाळ्यामध्ये शेतकऱ्यांच्या सर्व विहिरी काठोकाठ पाण्याने भरल्या आहेत. सर्व ओढे, नाले वाहू लागले आहेत. तालुक्यातील मोठे बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधाऱ्यामध्ये चांगल्या प्रमाणात पाणीसाठा झाला आहे. सध्या पाटबंधारे विभागाने अनेक कालव्यांना पाणी सोडले आहे. परंतु पावसाने शेतातच पाणी साठल्याने शेतकऱ्यांना आता त्या पाण्याची आवश्यकता वाटत नाही.

**मक्याचे क्षेत्र वाढले**

पंढरपूर तालुक्यात दमदार पाऊस झाला आहे. त्यामुळे यंदा शेतकरी लवकरच खरिपाची पेरणी करण्याची तयारी करु लागले आहेत. यासाठी कृषी विभागदेखील सज्ज झाला आहे. यंदा ९५०० हेक्टरवर खरिपाची पेरणी करण्याचे नियोजन आहे. पंढरपूर तालुक्यात मका २५५० हेक्टर, सोयाबीन ११० हेक्टर, उदीड १५० हेक्टर, तूर २५० हेक्टर, बाजरी ३०० हेक्टर, कापूस ५० हेक्टर नियोजन करण्यात आल्याचे तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत मोरे यांनी सांगितले.

# बनावट नोटरी आणि करारपत्राद्वारे प्लॉट विक्री; २२ जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेच्या हद्दवाढ भागातील मजरेवाडी आणि विविध नगरांमधील प्लॉट संदर्भातील बनावट नोटरी आणि कब्जा पावतीसह करारपत्र तयार करुन त्याची विक्री केल्यानंतर हे दस्तऐवज महापालिका मिळकत नोंदीसाठी सादर केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत महापालिका मालमत्ता कर विभागाचे सहाय्यक कर अधिकारी सूर्यकांत खसगे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली. त्यावरुन २२ जणांविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, पोलीस तपासात आणखी अनेक प्रकार उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



याप्रकरणी ख्वाजाभाई शब्बीर शेख, संजय मधुकर जाधव, रोहन रमेश पगडे, अश्फाक अली मुस्ताक अली सय्यद, नॉस नूर अहमद निलगुंडे, नरेश राजय्या दुडम, रजिया गुलाम अब्बास शेख, इक्बाल महेबूब शेख, रेश्मा वाहिद कोतकुंडी, जब्बार हुसेन बागवान, रेश्मा जावेद पिरजादे, एहतेशाम अजमुद्दिन हिप्परगी, रेश्मा नुरोद्दीन ड्रंके, आसिफ मौलाली मोमीन, लतिफा बेगम रफिक पिरजादे, जरीन बाबू पटेल, आसिफ सत्तार शेख, अल्ताफ हुसेन गौस, अझरुद्दीन मुनाफ सय्यद, नागय्या शिवलिंगप्पा स्वामी, हुसेन खाजाभाई कटोर, सुरेश केरप्पा जंगम असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२५ यादरम्यान हद्दवाढ भागातील क्रमांक ६७ मजरेवाडीस्थित राजीव गांधी नगर येथील प्लॉट नं. ११२, १४५, २०२, २०७, २३४, २४८, २६३, २८०, २८४, शिवपार्वती नगरमधील प्लॉट क्रमांक ६, ४९, ३०६, ३०७, ३०८, १३३, ७३८, ७३९, ८९१, ७४१, १३१, १०२७, १०२८, १०२२, १०२३, ८९६, ३१९, ७२५, ७४०, ६५१, ७१२, ८७७, ७४३, ७४५, ७२१, ७२२, ८८८. ये मुलवाडीमधील प्लॉट नंबर ६३ /अ, ६४/अ, चंद्रकला नगरमधील प्लॉट नंबर २५५ आणि सत्यसाई नगरमधील प्लॉट नंबर १४१ हे लिहून घेणार व सोलापूर महापालिका मिळकत नोंदसाठी सादर करणारे भोगवटदार यांनी ख्वाजाभाई शेख आणि त्याच्या साथीदारांकरवी फसवणूक केली.

स्टॅम्प पेपरवरील वर्षे कशाचे तरी सहाय्याने पुसलेले व त्यावर ॲड. एल.पी. देशपांडे व एच. एल. खान यांचा बनावट नोटरी कब्जा पावती व करार पत्र तयार करुन ते सोलापूर महापालिकेकडे मिळकत नोंद लावण्यासाठी सादर करुन सोलापूर महापालिकेची आणि मूळ जागा मालकाची फसवणूक केली आहे. हा प्रकार तपासात निष्पन्न झाल्यानंतर महापालिका प्रशासनाने या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याचे निर्देश मालमत्ता कर विभागाला दिले होते. याप्रकरणी एकास अटक करण्य आली. इतर आरोपींचा शोध सुरु आहे. अधिक तपास फौजदार गाढवे हे करीत आहेत. या प्रकारामुळे हद्दवाढ भागात एकच खळबळ उडाली आहे.

'नोटरी 'द्वारे शेकडो प्लॉटची विक्री मजरेवाडी आणि नई जिंदगी परिसरासह इतर अनेक ठिकाणी पाडण्यात आलेल्या शेकडो प्लॉटची विक्री नोटरीद्वारे करण्यात आले. विशेष म्हणजे, एकच प्लॉट अनेकांना विक्री केल्याचेही दिसून आले. महापालिकेतील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन अनेकांनी मिळकत नोंदीसाठी घेण्यात आल्या आहेत. रितसर दस्त खरेदी केल्यानंतरही काहींनी नोटरीद्वारे खरेदी करुन तेच प्लॉट आपल्या नावे महापालिकेत नोंदविल्याचे प्रकार घडले आहेत. यामध्ये मोठे रॅकेट असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**या भागात उघडकीस आला प्रकार**

महापालिका हद्दीतील हद्दवाढ भागातील मजरेवाडी परिसरात असलेल्या राजीव गांधी, नगर शिवपार्वती नगर, येमुलवाडी, चंद्रकला नगर, सत्य साईनगर आणि परिसरातील इतर अनेक नगर आणि भागांमधील प्लॉट संदर्भातील असे प्रकार उघडकीस आले आहे.

# अतिरिक्त, उपायुक्तांच्या विरोधात तक्रारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी गुरुवारी (दि. २९) दत्त चौकातील झोन कार्यलयात सर्व अधिकाऱ्यांना घेऊन जनता दरबार घेतला. यामध्ये परिसरातील नागरिकांनी २३ तक्रारी दाखल केल्या. या जनता दरबारात आयुक्तांना त्यांचेच सहकारी अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त यांच्या विरोधातील तक्रारीला समोरे जावे लागले. ज्या अधिकाऱ्यांच्या विरोधात तक्रारी दाखल झाल्या होत्या, ते अधिकारी जनता दरबारत हजर होते. तरीही आयुक्तांनी प्राप्त तक्रारीची दखल घेत जोगेवरच निपटारा केला.



गुरुवारी सकाळी ११ वजाता महापालिका आयुक्तांनी सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी जाणून घेतल्या. त्या तक्रारींचा जाब दरबारात उपस्थित नागारिकांना विचारला. एकूण २३ तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यामध्ये विभागीय कार्यालयाच्या संदर्भातच १२, नगररचना विभागाच्या विरोधात चार, विद्युत विभागाच्या विरोधात एक, अतिरिक्त आयुक्त नंबर दोन यांच्या विरोधात तीन तक्रारी, अतिरिक्त आयुक्त नंबर एक यांच्या विरोधात एक, उपायुक्तांच्या विरोधात चार तक्रारींचा समावेश होता. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक नगररचना संचालक मनिष भीष्णूरकर, नगरअभियंता सारिका आकूलवार, सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके उपस्थित होते.

**सोमवार आणि गुरुवारी करा तक्रारी**

शहरातील नागरिकांनी आपल्या समस्यांची तक्रार महापालिकेच्या माय सोलापूर या पोर्टलवर करणे अपेक्षित आहे. पण ज्यांना पोर्टलवर तक्रार करणे शक्य नाही, अशांनी विभागीय कार्यालयात सोमवार आणि गुरुवार या दिवशी तक्रार दाखल करण्याचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केले.

# ९ जुलै रोजी चा देशव्यापी सार्वत्रिक संप यशस्वी करा- कॉ आडम मास्तर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 27 फेब्रुवारी 2014 रोजी नवी दिल्लीतील सिरी फोर्ट ऑडिटोरियम येथे Confederation of All India Traders (CAIT) च्या सभेत व्यापाऱ्यांच्या धाडसाबाबत एक विधान केले होते. त्यावेळी ते गुजरातचे मुख्यमंत्री आणि भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार होते. त्या भाषणात मोदी म्हणाले होतेः

या विधानाचा अर्थ असा होता की व्यापारी आर्थिक जोखमी स्वीकारून व्यवसाय करतात, ज्यासाठी धाडस आवश्यक असते. मात्र त्यांनी सैनिकांच्या धाडसाची तुलना व्यापाऱ्यांशी केली आहे. हा सैनिकांचा अक्षम्य अपमान होता. अर्थातच हे सरकार भांडवल धार्जिणे सरकार आहे. हे या देशातील श्रमिक कष्टकरी जनतेला न्याय देऊ शकत नाही अशी परखड टीका करताना जनता व देश विरोधी धोरणे अंमलात आणू पाहणाऱ्या केंद्र आणि राज्य सरकारच्या विरोधात ९ जुलै रोजी सार्वत्रिक देशव्यापी संपाची हाक देण्यात आली तो संप यशस्वी करण्या करिता लढ्याच्या मैदानात उतरा असे आवाहन ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर यांनी सिटू च्या ५५ व्या वर्धापनी केले.



शुक्रवारी सिटू चे मध्यवर्ती कार्यालय दत्त नगर येथे ३० मे सिटू च्या ५५ व्या वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर व सीटू चे राज्य महासचिव ॲड एम एच शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्व कार्यकर्ते जगातील कामगारांनो एक व्हा, कामगार एकजुटीचा विजय असो, सिटू वर्धापन चिरायू हो, सर्व कामगारांना किमान वेतन व पेन्शन लागू, सामाजिक सुरक्षा लागू करा, कामगार कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करा, चार श्रम संहिता रद्द करा, जन सुरक्षा विधेयक मागे घ्या अशा गगनभेदी आवाजात जोरदार घोषणांनी सारा परिसर दणाणून सोडले. यावेळी सिटू चे राज्य महासचिव ॲड एम एच शेख यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की, जर आपण ९ जुलै रोजी देशव्यापी सार्वत्रिक संपात ताकदीने सामील नाही झाल्यास कोणत्याही परिस्थितीत सरकार कामगार विरोधी धोरणे अंमलात आणेल हा गंभीर धोका लक्षात घेऊन संप यशस्वी करूया त्यासाठी आजपासून तयारी करा. यावेळी मंचावर कॉ युसुफ शेख मेजर, कॉ.कामिनी आडम, कॉ.नलिनीताई कलबुर्गी, नसीमा शेख कॉ.म.हनीफ सातखेड, कॉ.रंगप्पा मरेड्डी, कॉ.व्यंकटेश कोंगारी, कॉ. ॲड अनिल वासम कॉ. दीपक निकंबे आदींची उपस्थिती होती.

यावेळी सिटू संलग्न सर्व युनियन्स चे पदाधिकारी व सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

